# प्रकरण पहिले

## मराठी नाटकातील स्त्रीविवाहविषयक समस्या आणि संघर्ष

*१) प्रस्तावना :*

*२) नाटकातील समस्या – संघर्ष :*

*३) स्त्री समस्या – संघर्ष :*

*४) निष्कर्ष :*

# प्रकरण पहिले

# मराठी नाटकातील स्त्रीविवाहविषयक समस्या आणि संघर्ष

## १. *प्रस्तावना :*

'नाटक' या साहित्य प्रकाराचे स्वरूप प्रेक्षक व रंगमंच सापेक्ष आहे. याच कारणाने नाटक ही एक दृक्-श्राव्य कला ठरली आहे. अशा या कलेत संपूर्ण जीवनाचा सर्वांगीण अनुभव व्यक्त करण्याची क्षमता आहे. त्याचबरोबर 'नाटक' हा संमिश्र साहित्य प्रकार वाचनीय स्वरूपातही आविष्कृत होतो. नाटकातून जीवनातील विविध संघर्षाचे अनुभव चित्रित झालेले पहावयास मिळतात. ते अनुभव नाटककाराला भावलेले वा जाणवलेले असतात. असा भावलेला जाणवलेला जीवनानुभव नाटककार आपल्या कल्पक शक्तीच्या साहाय्याने नाट्यकृतीत उतरवत असतो. या नाटकातील अनुभव वा जीवनाचा पट हा वेगवेगळया प्रयोगाच्या साहाय्याने रंगभूमीवर सादर करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्यामुळे जास्तीत जास्त समाजाभिमुख पोहचणारा साहित्यप्रकार म्हणून नाटकाला ओळखले जाते.

भिन्न समाजातील, भिन्न स्तरातील, भिन्न साक्षर–निरक्षर व्यक्ती अशा रंगमंच सापेक्ष साहित्य प्रकार कडे आकर्षित होत असतात. त्यामुळे नाटक या साहित्यप्रकारातून समाजजीवनातील विविध घटना आणि त्यातील गहन स्वरूपाचा गुंता यांची नाटककार आकर्षक मांडणी करत असतो. अशा घटनांतील समस्या–संघर्षांना अनुकूल व प्रतिकूल स्वरूपात समाजाभिमुख पाहोचवण्याची क्षमता ही इतर साहित्य प्रकारापेक्षा नाटकात तुलनेने सर्वाधिक आहे. नाटकातील जीवनपटातून येणाऱ्या घटना आणि प्रसंगातील समस्या–संघर्षांच्या दर्शनाने प्रेक्षकाचे समाजमन अंतर्मुख बनते. यामुळे समाजात जीवन जगताना असे घटना, प्रसंग प्रेक्षकांस विचार करायला लावतात. अशा प्रभावी आणि भिन्न वैशिष्ट्यामुळे प्रेक्षक नाटकाच्या साहाय्याने समाजभिमुख जाऊन पोहचतो. मानवी जीवन दर्शनामध्ये समाज केंद्रस्थानी असतो. अशाच स्वरूपाच्या जीवनपटाच्या दर्शनात

परंपरागत हिंदू समाज व्यवस्थेतील स्त्री–विवाहाच्या समस्या व संघर्ष यांना महत्वाचे स्थान दिले गेले आहे. अशी समस्या संघर्षाची चित्रणे समाजातील प्रेक्षकास अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात. कारण अशी नाटके मुळातच सामाजिक आशय–विषय घेऊन निर्माण केलेली असतात.

## २. *नाटकातील समस्या – संघर्ष :*

नाट्य म्हणजे द्वंद्व, संघर्ष, वृत्ती–प्रवृत्ती किंवा चमत्कृती इत्यादींची जाण नाटककाराला होत असते. तेव्हा त्याच्या मनात नाटकाचे बीजारोपण होते. प्रेक्षकाच्या मनात असलेला किल्ला नाटककार संघर्षमयरित्या सर करून दाखवतो. नाटककाराला जाणवलेल्या द्वंद्वातून पात्र प्रसंगांचा जन्म होतो. यामुळे नाटकात संघर्ष असणे जितके आवश्यक आहे, तितक्याच समस्याही नाटकात असणे गरजेचे आहे. जर नाटकात समस्या असेल तर त्यावरचा संघर्ष नाटकात चित्रीत केल्याने नाटकाला नाट्यत्व प्राप्त होते. 'प्रतिभासाधना' या ग्रंथात ना. सी. फडके यांचे दिलेले 'संघर्ष हा ललित वाङ्मयाचा आत्मा आहे,' हे मत यादृष्टीने अगदी सार्थ आहे. या समस्यांच्या संघर्षमय चित्रणामुळे नाटकात रंगत निर्माण होते.

संघर्ष या शब्दाचा विचार केला तर त्यासाठी लढा, संग्राम, झगडा, कलह, वाद, समरप्रसंग, भांडण. द्वंद्व (Conflict) इत्यादी अर्थ असलेले दिसतात. अशा विविध शब्दांचा वापर समाजजीवनात विविध ठिकाणी होत असताना आपणास दिसतो. अशा समाजजीवनातील संघर्ष हे विविध समस्येवर आधारीत असतात आणि त्यातून जीवन जगताना काही ना काही नक्कीच शिकायला मिळत असते. रंजन होत असते. असे या संबंधी प्रा. म. वि. फाटक यांचे मत,

"जीवनाची खरी रंगत–जीवनाचे खरे मोजमाप त्यातील संघर्षावरच अवलंबून असते. जीवन म्हणजे लहान मोठ्या झगड्यांची आदी काळापासून आत्तापर्यंत चालत आलेली एक मालिकाच आहे, जीवनात जर संघर्ष नसेल तर ते एकमार्गी होईल; जीवनात खळबळ नसेल, स्पर्धा नसेल, काही उदात्त ध्येयसाठी

निष्टायुक्त धडपड नसेल तर ते रूचकर वाटणार नाही, ते मिळमिळीत व अळणी वाटू लागेल आणि त्याचा कोणावरही परिणाम होणार नाही."(१)

यावरून असे म्हणता येईल की, ज्या नाटकात संघर्ष नाही ते नाटकच होऊ शकणार नाही आणि झाले तरी त्यात मोठ्यात्मकता निर्माण होऊ शकणार नाही. ज्यातून मनोरंजन, प्रबोधन या गोष्टी साध्य होऊ शकणार नाहीत. एका कुरूप निर्धन तरूणाचे एका श्रीमंत व सुंदर तरूणीवर प्रेम जडले आहे आणि तिच्या घरच्या मंडळींना जे धनवान आहेत त्यांचा या तरूणाच्या प्रेमाला संघर्ष करणारा कुठलाही विरोध नाही, ते प्रेम सहज सफल होऊन त्याचे विवाहातही सहज रूपांतर होते. असे उदाहरण अवास्तव तर आहेच पण त्यात सुख–दुःख हे भावच नसल्याने त्यांच्या भावी आयुष्यात काडीमोडीचा प्रसंग ज्याला आपण मोठी समस्या मानतो ती समस्या समस्या न राहता नुसती फक्त एक क्रिया म्हणून उरेल. भावशुन्य दृश्याचे हे उदाहरण नाटकात विफल ठरेल. नाटकातून जीवनदर्शन घडवायचे असेल तर त्या दर्शनात समस्या व संघर्ष यांना वजा करताच येत नाही. अशा स्वरूपाच्या नाट्य चित्रणात उत्कंठा, मौज, कलात्मकता इत्यादी गोष्टी लोप पावल्याने नाटक प्रेक्षकांत लोकप्रिय ठरूच शकत नाही. वास्तव जीवनातील घटना, प्रसंग त्यातील समस्या, संघर्ष यांच्या चित्रणाशिवाय नाटकच काय पण कुठलाही वाङ्मय प्रकार विकसीत होऊच शकणार नाही अणि तो झालेलाच नाही. नाटक हे एक विराट मानवी संसाराचे दर्शन आहे. नाटकात येणाऱ्या मुलभूत प्रभावी रसांच्या निर्मितीसाठी संघर्ष हा घटक महत्वाचा आहे. भावना जागृतीसाठी संघर्ष हा घटक प्रेरणादायक आहे. यामुळे मानवी जीवनाच्या दृश्य व अदृश्य मानसिक हालचालींच्या दर्शनासाठी नाटकात संघर्ष अत्यावश्यक आहे.

### *२.१ समस्या व संघर्ष यातील भिन्नता :*

समस्या म्हणजे प्रश्न, संघर्ष म्हणजे संग्राम, लढा, समरप्रसंग, झगडा, द्वंद्व; संघर्ष म्हणजे; दोन विरोधी शक्तींचा सामना, व्यक्ती विरूद्ध व्यक्ती, व्यक्तीविरूद्ध

परिस्थिती; तसेच एका व्यक्तीच्या अंतर्मनातील दोन विरोधी वृत्ती, असे संघर्षाचे तीन ठळक प्रकार सांगता येतात. नाट्यसंहितेच्या अभ्यासासाठी परस्पर संबंध असलेल्या कथानक, पात्रे, संवाद आणि भाषाशैली यांचा विचार या घटकांसह संघर्षाचाही विचार करावा लागतो. समस्या म्हणजे संघर्ष नव्हे, तर ते एकमेकांवर अवलंबून असतात. कधी समस्येतून संघर्ष तर कधी संघर्षातून समस्या निर्माण होते. उदा. हुंडा समस्येतून संघर्ष निर्माण होतो तर त्या संघर्षातून घटस्फोटाच्या समस्येची निर्मिती होत असते. स्त्रीच्या असलेल्या विविध समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील. रूढी–परंपरा, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, स्वत्वाची जाणीव, मूल्यांचा ऱ्हास, शारिरीक आजार व मानसिक विकृती अशा या केवळ स्त्रियांच्या म्हणून सांगता येतील अश्या समस्या असून या समस्यांमधून स्त्री संघर्षाची निर्मिती होते.

## ३. स्त्री समस्या – संघर्ष :

समाजात दैनंदिन सामाजिक जीवन जगताना नानाविध प्रकारच्या समस्या–संघर्षाला माणसाला सामोरे जावे लागते. या अशा अनुभवांचे चित्रण मराठी समाजिक नाटकात येत असते. स्त्री बाबतच्या अशा चित्रणांच्या स्वरूपाचा व मांडणीचा परिचय करून देण्याचे प्रयोजन प्रस्तुत प्रकरणात आहे. स्त्रीविषयक सर्वच समस्या–संघर्षाच्या चित्रणांचा परिचय करून देणे संशोधनाचा आवाका लक्षात घेता अशक्य होईल. यामुळे विषयानुरूप असलेल्या स्त्री विवाहाच्या समस्या व संघर्ष यांच्या चित्रणांचा परिचय करून देणे गरजेचे आहे. त्यानुसार मराठी सामाजिक नाटकातील स्त्री विवाहविषयक समस्या–संघर्षाच्या चित्रणांची मांडणी व स्वरूप पुढीलप्रमाणे :

### ३.१ वैवाहिक सामाजिक संघर्षाची मांडणी व स्वरूप :

वास्तवाचा विचार केला तर स्त्रीविषयक अनेक समस्यांची मोठी यादी किंवा एखादी पुस्तिकाच तयार होईल. अशा यादीतूनच मराठी नाटकात स्त्रीविषयक

विविध समस्यांच्या चित्रणाला सुरूवात झाली असेही मराठी नाटकाच्या इतिहासावरून आपणास दिसते. संशोधन विषयाचा विचार करता स्त्री विवाहाच्या समस्यांची मांडणी व संघर्षाचे चित्रण मराठी नाटकात कसे झाले आहे याचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृतीत आदिम काळापासून आजपर्यंतच्या विविध संस्कारात विवाह या संस्काराला विशेष महत्व आहे. हा पारंपरिक विवाह संस्कार एका सणासारखा महत्वाचा मानला जातो. या सोहळयात अपेक्षित स्त्री–पुरूषाच्या मिलनाला संमती देण्याची एक सामाजिक परंपरा आहे, प्रथा आहे, ती आजही रूढ आहे. संपूर्ण भारतवर्षात वेगवेगळया पद्धतीने हा संस्कारसोहळा करण्याची पद्धत आहे. या पद्धतीनुसार हा संस्कार सोहळा पार पडल्यानंतर प्रापंचिक, कौटुंबिक जीवनाला आरंभ करण्यास संस्कृतीनुसार समाज मान्यता देतो. या संस्काराव्यतीरिक्त अलीकडच्या काळात मात्र विवाहोत्तर संबंधाला, मिलनाला समाज अनैतिक ठरवतो. अशा स्त्री पुरूषांच्या अनैतिक संबंधातून जन्मलेल्या अपत्यांनाही समाज अनौरस, अक्करमाशी म्हणून ओळखतो. समाजात विवाह संस्कारासाठी अपेक्षित स्त्री–पुरूषांची अपेक्षा असते. उदा. ज्या जातीचा वर त्याच जातीची वधू असावी. किंवा स्त्रीचा पूणर्विवाह होऊ नये. तो फक्त पुरूषाचा व्हावा व त्याला त्याच्या मताप्रमाणे वधू मिळावी. अशा काही चुकीच्या अपेक्षा समाजात रूढ झालेल्या आहेत. यासाठी समाजपरिवर्तन घडवून आणणाऱ्या समाजसुधारकांनी, नाटककारांनी तसेच इतर वाङ्मयकारांनी प्रयत्न केले आहेत. भारतीय संस्कृतीतील विवाह संस्कारात काळाप्रमाणे बदल घडणे अपेक्षित आहे. त्यासाठी समाजपरिवर्तन होणे गरजेचे आहे.

भारतीय हिंदू विवाह पद्धत ही अतिशय प्राचीन आहे. अशा विवाहाचे आठ प्रकार मानले गेले आहेत.

१) ब्रह्म. २) दैव. ३) आर्ष. ४) प्रजापात्य. ५) आसुर. ६) गांधर्व. ७) राक्षस.
८) पिशाच्छ.

प्रेमविवाह हा विवाह गांधर्व प्रकारचा विवाह आहे. पौराणिक काळातील शकुंतलेचा झालेला विवाह हा गांधर्व विवाह होता. हा गांधर्व विवाह आजच्या काळात प्रेम विवाहाच्या रूपात चालत आलेला आहे. भूतकाळापेक्षा आजचे प्रेम विवाहाचे प्रमाण मोठे आहे. नव तरूण–तरूणींच्या मनाच्या मिलनाचे पर्यावसन विवाहात होण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा विवाहाने विवाहाच्या नियमित संस्कारांचे उल्लंघन केल्याचा आरोप समाज आजही करतो आहे. यामुळे समाज मान्यतेच्यादृष्टीने आजही गांधर्व विवाह एक समस्याच आहे. समाजाच्या मते गांधर्व विवाहात एकाच जातीचे वधू–वर असावेत. एकाच आर्थिक वर्गातले असावेत, एकाच सौंदर्यगटातील असावेत, त्याला घरातील (कुटुंबातील) इतर सदस्यांची परवानगी असावी. परंतु अलीकडच्या काळात दळणवळण, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, दूरध्वनी, भ्रमणध्वनी अशा गोष्टींच्या प्रगतीने जागतीकीकरणात मोठी प्रगती झाली असून जगातला कुठलाही भाग सहज संपर्कात येत आहे. यामुळे अशा जागतीकीकरणात कौटुंबिक खानदानीपणा, जात, धर्म यांच्या सीमा पुसट झाल्या आहेत. धावपळीच्या या गतीमान युगात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या मानसिकतेचा विचार करत जगताना दिसते. अशातच कोठेतरी प्रेमाच्या भावनेने त्याला आकर्षण निर्माण होत आहे. अशा आकर्षणात विभिन्न समाजातील प्रेमाबाबत अनिष्ट वाटणाऱ्या रीतिरिवाजाला स्थान नाही. यातून निर्माण होणारा 'नवा तरूण समाज बिघडत चालला आहे.' असा मागासलेला समाज कुरघोडी करून एक मोठी समस्या निर्माण करत आहे.

आजही पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेत विचित्र व अनिष्ट अशी सांस्कृतिक परंपरा म्हणजे वधू परीक्षा होय. ही वधू परीक्षा संपल्यानंतर निर्माण होणारी दुसरी समस्या म्हणजे हुंडा. या समस्येतून निर्माण होणारी समस्या म्हणजे विजोड विवाह. विजोड विवाह हा बऱ्याचदा आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने, लग्नासाठी हुंडा देण्याची ऐपत नसल्याने असा विवाह कुणाशीही लावला जातो. यात बालिकेचा एखादया जरठाशी विवाह होतो तर कधी एखादया रूपवान गरीब

मुलाची श्रीमंत वेडसर किंवा कुरूप मुलाशी विवाह लावून दिला जातो. तसेच गरीबी व सौंदर्याच्या अभावाने सुजाण असलेल्या मुलींना कुमारिका म्हणून आयुष्य जगावे लागते. ही एक गंभीर समस्या आजही समाजात जशी दिसते, तशी मराठी नाटकातही दिसते. वेगवेगळया समस्या नाटकात चित्रित झाल्या आहेत. वधू परीक्षा, हुंडा, विजोड विवाह, प्रेम विवाह या त्यात प्रमुख आहेत.

### *३.१.१ वधू परीक्षा :*

लग्नाअगोदर मुलीला पाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याची रूढ प्रथा आहे. या पाहण्याच्या कार्यक्रमात वधूची वरपक्षाकडून परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत वधूला नाना प्रश्न विचारले जातात. प्राचीन ग्रंथात विविध विवाहांविषयी वर्णने आलेली आहेत. पण कुठल्याच वर्णनात कुठल्याही विवाहाच्या अगोदर वधू परीक्षा झालेली आहे असे दिसत नाही. उलट लग्नासाठी स्वयंवराचे आयोजन करण्याची प्रथा प्राचीन काळी रूढ होती, असे त्या वर्णनात दिसते. अशा या वधू परीक्षेचा 'भारतीय संस्कृती कोशातील' अर्थ पुढीलप्रमाणे :

"वधू शुभ लक्षणयुक्त असावी."

तर मनूने यावर जोर देऊन असे म्हटले आहे की,

वधू सुदृढ किंवा अव्यंग असावी."

यावरून असे दिसते की, कोशकारांनी वधू परीक्षेच्या अर्थाचे योग्य वर्णन केलेले नाही. वधू परीक्षेच्या एकूण स्वरूपावरून व तिच्या आयोजनातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करता वधू परीक्षा ही एक अलीकडच्या काळात फोफावलेली अनिष्ट रूढी—परंपरा आहे असे दिसते. कोशकारांनी वधू परीक्षेचा अर्थ न सांगता तिची लक्षणे म्हणजे ती कशी असावी याविषयीच सांगितले आहे. बालविवाहाबरोबरच ही प्रथा कदाचित चाालू झाली असावी. गोडधोड किंवा मिठाई खाण्यास मिळत असल्याने त्यावेळी पुन्हा पुन्हा होणाऱ्या वधू परीक्षेची बाल वधूला गंमत वाटत असावी. त्यावेळी ही प्रथा रूढ होऊन आजपर्यंत चालत आली. परंतु

आज स्त्री शिक्षण घेत आहे. त्यामुळे तिला चांगल्या वाईटाची जाणीव होत आहे. तरीही समाजमनाची पारंपरिक मानसिकता बदललेली नाही. त्यामुळे आजही वधू परीक्षा ही एक समस्या म्हणून टिकून राहिलेली आहे.

या समस्येअंतर्गत वधूच्याच कुटुंबात अनेक समस्या सामावलेल्या आहेत. मोठ्या मुलीच्या लग्नानंतर लहान मुलीचे असे क्रमाक्रमाने लग्न लावण्याची परंपरा हिंदू विवाह संस्कृतीत रूढ आहे. मोठ्या मुलीला वारंवार वधू परीक्षेत नापसंत केल्याने मोठ्या मुलीबरोबरच लहान मुलीच्या लग्नाची समस्या निर्माण होऊन बसते. कधी कधी अशा प्रसंगी लहान भावंडांची लग्न उरकण्याचा प्रयत्न करून निर्माण होणारी नवी समस्या थोपवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा वेळी मोठ्या मुलीला अनेक संघर्ष नाईलाजाने पत्करावे लागतात. मानवीय पातळीवर वधू परीक्षेने मोठ्या मुलीवर अन्यायच होत असतो. लग्न सोहळयात वधू पक्ष खालच्या दर्जाचा तर वर पक्ष वरच्या दर्जाचा असा वधूवर अन्याय करणारा रूढ समज नेहमी समस्या उभी करताना दिसतो. यामुळे वरपक्षाच्या मर्जीनुसार विवाहाचे आयोजन करणे वधू पक्षाला भाग पाडले जाते. या वधू परीक्षेतून स्त्री विषयक मोठी समस्या निर्माण होते. येथे स्त्रीत्वाचा अपमान होताना दिसतो. वधू परीक्षेत वारंवर नापसंत झाल्याने कधी नववधूला विजोड तर कधी हुंडा तर कधी कुमारिका म्हणून आयुष्य कंठण्याला सामोरे जावे लागते. अशा वधू परीक्षेच्या समस्या—संघर्षाचे मराठी नाटकातील चित्रण पुढीप्रमाणे सांगता येईल.

### *३.१.१.१ 'आनंदी गोपाळ' — राम जोगळेकर*

या नाटकात राम जोगळेकरांनी सुशिक्षित वधू परीक्षेचे चित्रण करून

अनिष्ट असलेल्या पारंपरिक वधू परीक्षेतून निर्माण होणाऱ्या अडचणी मांडल्या आहेत. हुंडा न देता विजोड विवाह करणे ही एक मजबूरी दाखवून नाटककाराने वधूच्या आयुष्याची झालेली वाताहातही चित्रीत केली आहे. गरीबीविरूद्ध तसेच मानपानाखातर एक संघर्ष म्हणून यमूचे वडील इनामदार

गणपतराव जोशी आपल्या मुलीचा विजोड विवाह करतात. मुलीच्या आवडी–निवडिला वडिलांच्या सांपत्तिक गरीबीने बांधून ठेवले जाते. पोस्ट खात्यात कायम स्वरूपाच्या नोकरीत असलेल्या अठ्ठावीस वर्षीय विदूर असलेल्या गोपाळरावांना आपली केवळ १० वर्षाची मुलगी द्यायला गणपतराव मागे–पुढे पाहत नाहीत.

वधू परीक्षेच्या कार्यक्रमासाठी गोपाळराव एकटेच जातात. कुठलाही प्रश्न न विचारता फक्त मुलीला पाहतात. पण तरी जुन्या बुरसटलेल्या रिती–रिवाजांची पूर्तता म्हणून मध्यस्थ सोमण ब्राह्मण गोपाळरावांकडून मुलीला प्रश्न विचारतात, "मुलीला पुरणपोळी करता येते का? कडबू? घोवर? जिलेबी?".(४) मुलीच्या खाण्या–पिण्याच्या, हसण्या–खिदळण्याच्या वयात तिला असे प्रश्न विचारलेले आयोग्य आहे. सदर पदार्थांची नावे घेताना मध्यस्थच अडखळतोय, तर ती पक्वान्ने बनवणे लांबच आहे असे चित्र नाटककाराने अगदी सार्थपणे रंगविले आहे. वधू परीक्षेबाबत नाटककाराने गोपाळरावांना सुईमध्ये दोरा ओवणे, एका पायावर उभे राहणे, गाणे म्हणून दाखवणे इ. अनिष्ट चाली–रितीचे प्रश्न आवडत नाहीत. गोपाळराव म्हणतात, "सगळीकडे तेच तेच प्रश्न, पण मुलीला लिहिता वाचता येत का? असं कुणी विचारलं?"(५)

एक तर वधू परीक्षा होऊ नये व झालीच तर अनिष्ट प्रश्न विचारणे टाळावे व अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करून थेट विवाहाची तयारी करावी असे गोपाळराव आपल्या बोलण्यातून सुचवितात.

असे एकूणच विविध समस्यामय नाटक राम जोगळेकरांनी रंगवले आहे.

### *३.१.१.२ माझं काय चुकलं? – रत्नाकर मतकरी*

सदर नाटकातून वरपक्षाच्या मर्जीमुळे वधु पक्षाची होणारी वाताहात रंगविणारे चित्रण आले आहे. वधू नयनचे पालक हे तिचे चुलत भाऊ एक डॉक्टर असतात. दवाखान्यात कंपाउंडर असलेला प्रसाद साने दिसायला सुंदर असतो. स्वभावाने

भाई त्याला पूर्वीपासून ओळखत असतात. तो एका कंपनीत चांगल्या पदावर काम करतो. ते आपल्या बहिणीशी प्रसादला लग्नाची विनंती करतात. त्याचा प्रसादची आई गैरफायदा घेते. आपल्या वृद्धापकाळाचा बहाणा करून प्रसादला वधू परीक्षेचा कार्यक्रम आपल्याच घरी आयोजित करण्यास सांगते. शेवटी वरपक्षाचा असलेला वरचा दर्जा डॉक्टर मान्य करतात. ते म्हणतात, "आज न येऊन सांगतो कुणाला? मुलीची बाजु आमची. तुम्ही मुलगी दाखवायला घेऊन या म्हणालात की झक्कत आलंच पाहिजे. आम्हाला नाक मुठीत धरून काय!"(६)

आपले कंपाउंडर असलेल्या एका व्यक्तीशी लग्न लावतानाही भाई आपल्या प्रतिष्ठेचा विचार न करता खाली मान घालून विवाह उशिराने करण्यास तयार होतात. येथे वधू नयन हिचा मात्र कुठलाच विचार केला जात नाही. प्रसाद भाईंना म्हणतो, "माफ करा डॉक्टर, खरं म्हणजे मी आधीच सांगायला हवं होतं. ........... तुम्ही म्हणालात म्हणून मुलगी पसंत करून ठेवली. पण सुमीचं झाल्याशिवाय मला कसं लग्न करता येईल?"(७)

अशा प्रकारे वधूपक्षावर वरपक्ष हवी तशी मनमानी करतो, हे समाजवास्तव नाटककाराने येथे चित्रित केले आहे.

### ३.१.२ हुंडा प्रथा

विवाह या सांस्कृतिक सोहळयाच्या निर्मितीत एक अनिष्ट परंपरा असलेली आपणांस दिसते, ती म्हणजे हुंडा पद्धत . या पद्धतीला 'वरदक्षिणा' या नावानेही संबोधले जाते. येथे एक पुरूषच दुसऱ्या पुरूषाच्या भावनेशी खेळत असतो. एक पुरूष एका वधूचा पिता असतो. अशा वेळी पुरूष - पुरूष संघर्षात वधूपिता आपला (वधूचा) जास्त विचार न करता समाजाचाच विचार करतो. सत्तेसाठी दोन पुरूषात अदृश्य स्वरूपात शीत संघर्ष सामावलेला असतो. समाजाच्या भीतीपोटी आपली मुलगी लग्नाशिवाय राहू नये म्हणून वधुपिता 'वरदक्षिणे'त तडजोड करून विवाहाची जुळणी करतो. ही वरदक्षिणा रूपयांच्या, वस्तूच्या रूपाने वराला दिली जाते. त्यासाठी वधुपिता कर्जबाजारीही होतो. अशा हुंडा

प्रथेसंदर्भात वि. म. बेडेकर म्हणतात, "हुंडा किंवा विवाहापूर्वी मुलीच्या वडिलांनी मुलाच्या वडिलांशी करार करून द्यावयाचे द्रव्य ही पद्धत प्राचीन काळी अस्तित्वात नव्हती. मुलीचे वडील मुलीला पाठवताना नजराणे देत असत. द्रौपदी, सुभद्रा, उत्तरांच्या विवाहात असे उल्लेख आहेत. त्यामागे स्नेहभाव होता अट नव्हती. पुढील काळात तेराव्या चौदाव्या शतकापर्यंत हुंड्याची पद्धत सुरू होऊन ती वाढू लागली. विवाहात कन्यादान करावे लागते. त्यातील दानाचा एक विशिष्ट अर्थ घेऊन कन्येच्या दानाबरोबर इतरही काही सोने व मौल्यवान वस्तू देण्याचा प्रघात पडला असावा. पण त्याचे मोल तेव्हा नाममात्र होते. वरपक्षाचा कुळाभिमान व अडवणूक, वधू पक्षाची आपल्या मुलीचा शक्य तो लवकर विवाह व्हावा ही वाढती चिंता यातूनच जाचक स्वरूपाची हुंडा पद्धती अमलात आली असावी."(८)

त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीकोशातही हुंडा याचा अर्थ "हुंडापद्धती कन्येचा विवाह होण्यापूर्वी भावी जावयाला किंवा त्याच्या पित्याला आपली मुलगी स्वीकारावी म्हणून जे द्रव देतात त्याला हुंडा असे नाव आहे ...... विवाहाच्या वेळी कन्येने दान केल्यावर काही रोख रक्कम किंवा एखादा दागिना वराला देण्याची पद्धत होती. पण त्याला प्रचलित अर्थाने हुंडा असे म्हणता येणार नाही. कारण हे सर्व मुलीच्या पित्याच्या इच्छेवर अवलंबून असे."(९)

वरील हुंडा पद्धतीच्या अर्थावरून असे दिसते की, ही पद्धत अलीकडच्या काळात फोफावली असून ती वधूपक्षाच्या इच्छेविरूध्द असल्याने एक अनिष्ट समस्या ठरली आहे. सामाजिक सुधारणा आणि कायद्याला कोठलेही स्थान न देता समाजात ती चांगलीच रूढ झालेली आपणास पहावयास मिळते. सुंदर व सुशील मुलीचा सांपत्तीकदृष्ट्या गरीब असलेला पिता किंवा पालक फक्त आपल्या मुलीचे लग्न करण्याचे ध्येय फक्त समोर ठेवतो. जवळ पैसा नसल्याने हुंडा देऊ शकत नाही म्हणून तो आपली मुलगी कधी विदूराला तर कधी जरठालाही देऊन टाकतो. तर कधी तो आपली मुलगी दिसायला साधारण आहे, आपली आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे, मुलीच्या लग्नाचा खर्च आणि हुंडा या आर्थिक गोष्टींमुळे आपल्या मुलीच्या लग्नाला होणाऱ्या विलंबाने समाज काय म्हणेल, म्हणून एकदाचे आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त व्हावे म्हणून वाट्टेल तो मार्ग

अवलंबतात. यामुळे मुलीचे भावी आयुष्य धोक्यात येते. हुंडा पद्धती ही अनेक समस्यांना कसे आमंत्रण देते. असे चित्रण मराठी नाटकात झालेले आपणास दिसते, ते पुढीलप्रमाणेः

### *३.१.२.१ 'आनंदी गोपाळ' – राम जोगळेकर*

गोपाळराव विदूर आहेत. तसेच ते सुधारीत विचारांचे आहेत. तर कोठेतरी त्यांनी समान मानवी स्तराचा विचार करून एखादया विधवेशी विवाह का करू नये असाही प्रश्न उभा राहतो. पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेत समाजाने पुरूषाला हवे तसे आणि हवे तितके विवाह करण्याची मान्यता देऊन स्त्रीवर मोठा अन्यायच केला आहे असे दिसते. स्त्रीने एकदा विवाह झाल्यानंतर परत ती विधवा झाली तर तिने आपले आयुष्य तसेच घरात कोंडून घेऊन घालवायचे, असे समाजाचे अन्यायकारी नियम स्त्रीच्या जीवनात अनेक समस्या निर्माण करतात.

गणपतराव जोशी हे इनामदार असतात. त्यामुळे ते एक सदगृहस्थ म्हणून समाजात त्यांना मान असतो. दहा वर्षीय यमूच्या लग्नाची त्यांना काळजी असते. पण सांपत्तीकदृष्ट्या हतबल असल्याने व मुलीचे वय वाढतच चालल्याने त्यांच्या मनात एक सामाजिक भिती निर्माण होते. यामुळे त्यांना हुंडा पद्धतीत तडजोड करण्यासाठी म्हणून बीजवराशी आपल्या मुलीचे लग्न लावून द्यावे लागते. मायेपोटी विरोध करणाऱ्या यमूच्या आईला गणपतराव सामाजिक वास्तवाचे कारण सांगून गप्प बसवतात. तेथेही स्त्रीच्या मताला काहीच किंमत नाही.

या नाटकात बीजवर झाल्याने गोपाळराव हुंडा पद्धतीच्या विरोधी जाऊन हुंडा न घेता अल्पवयीन यमूशी विवाह करण्यास तयार आहेत तर लग्नात हुंडा देऊ शकत नाही म्हणून गणपतराव आपल्या मुलीचे विदूराशी लग्न उरकण्याची घाई करतात. पालक मुलीच्या लग्नाच्या जबाबदारीतून मुक्त होतात. पण मुलांच्या संघर्षमय जीवनाला सुरूवात करून देतात. येथे एका पुरूषानेच एका पुरूषाकडून एका स्त्रीचा खून केला आहे. यासंदर्भात गणपतरावांचे "कुठल्याही बिजवराला दुध–भात घालून मुलगी स्वाधीन करायचा विचार आहे माझा." हे उद्गार महत्वाचे आहेत, असे येथे दिसते.

### ३.१.२.२ 'अग्निदिव्य' – रत्नाकर मतकरी

सदर नाटकात नायिका नववधू मृदूला ही बी. एस्सी. आहे. विवाहासाठी बऱ्याचदा तिची पत्रिकाही जुळत नाही. अव्वाच्या–सव्वा हुंडा मागितल्यानेही लग्न ठरत नाही. अशा सामाजिक अनिष्ट अशा मानसिकतेने मृदूला ग्रासली आहे. तिचे वडील लग्नासाठी नेहमी चिंतेत असतात. अशावेळी एम. ए. झालेला पाटणकर जो बँकेत नोकरीला असतो तो हुंडा न मागता मृदूलाला मागणी घालतो. हा पाटणकर चतुर असतो. काही काळ गेल्यावर पाटणकर गोपाळरावांना एक पत्र पाठवून कळवतो की;

"घरच्या कटकटीने आप्ण घरापासून वेगळे राहण्याचा विचार केला आहे व घरच्या कटकटीला कंटाळून मी असा निर्णय घेतला आहे की, तात्काळ वेगळी जागा घ्यायची. त्याशिवाय तुमच्या मुलीचा संसार सुखाचा होणार नाही. वेगळी जागा घेतल्याशिवाय मी लग्नाचा विचारही करू शकत नाही. सुदैवाने अशी एक जागा पाहण्यात आहे. पन्नास हजारापर्यंत मिळेल. तरी आपण पन्नास हजारांची व्यवस्था केल्यावरच हे लग्न होऊ शकेल."(११)

असा प्रत्यक्ष हुंडा या शब्दाचा उल्लेख न करता हुंडा मागितला जातो. यामुळे हवालदिल होऊन मृदूलाचे वडील गोपाळराव नाईलाजाने विवाह मोडतात. यामुळे मृदूलाच्या विवाहाबाबत आणखीनच समस्या निर्माण होतात. लग्न मोडले तर वधूपक्षाची लग्न जुळवताना खूप चौकशी केली जाते, पण वराच्या दोषांकडे दुर्लक्ष करुन समाज त्यावर पांघरूण घालत असतो.

नाटकात दुसरी घटना दाखविली आहे ती विदूर असलेल्या वराची व सुनेला छळणाऱ्या अन्यायकारक घटनेची. महेश गायधनी याचा पहिला घटस्फोट झाला आहे, हे लपवून तो 'फायझर' कंपनीत तीन हजार रूपयांच्या पगारावर इंजिनिअर आहे असे सांगून, मृदूलाचे वडील गोपाळराव यांना वश केले जाते. यावेळी सोपारकर हे गोपाळरावांचे मित्र मुलाच्या वास्तव परिस्थितीबाबत सर्व माहिती देतात. पण गोपाळराव मित्राच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून आपल्या मुलीला

समस्यांच्या – संघर्षाच्या काट्यात अडकवतात. महेशची आईही आपल्या मुलाचे खोटे कौतुक करत नोकरीत बढती आणि कंपनीकडून मोटारसायकल मिळणार म्हणून पंचवीस हजार रूपये हवेत असे सांगते. शेवटी आपल्या समस्यांच्या जबाबदारीतून मोकळे होऊन घटस्फोटीत महेशबरोबर आपल्या मुलीचा पंचवीस हजार रूपये हुंडा देऊन विवाह करतात. पैशाचे लालची असलेले महेश आणि त्याची आई माहेरून पैसे आणावेत म्हणून मृदुलावर जबरदस्ती करतात. त्यासाठी तिला मारहाण करतात, उपाशी कोंडून ठेवतात. बी. एस्सी शिकलेली मृदुला सर्व अन्याय सहन करत–करत मनातल्या मनात संघर्ष करत राहते. माहेरी मृदुलाच्या छळवणूकीचे वृत्त समजल्यावर गोपाळराव मृदुलेला घरी घेऊन येतात. पुढे तिचा महेशबरोबर घटस्फोट होतो. अशा प्रकारे नाटककाराने नाटकात हुंड्यामुळे स्त्रीच्या जीवनाच्या होणाऱ्या वाताहातीचे चित्रण केले आहे.

### *३.१.३ आंतरजातीय प्रेमविवाह :*

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाला. शिक्षणाने नवतरूण वर्ग स्वातंत्र्याकडे वाटचाल करू लागला. त्यात स्त्रीचेही प्रमाण विचार करण्याएवढे होते. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण खेडोपाडी जाऊन पोहोचले. स्त्री शिक्षणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शिक्षणाने भूतकालीन स्त्री जीवनाचा ती अभ्यास करू लागली. त्यातून तिला आत्मभान येऊ लागले. दळणवळणाच्या सोईसुविधांमध्ये मोठी प्रगती झाली. यामुळे सुशिक्षित, विचार करणारी तरूणी स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी उज्वल भविष्य घडविण्यासाठी घराबाहेर, गावाबाहेर जाऊ लागली. गावाकडून शहराकडे तिची वाटचाल तर झालीच पण शहरातही शहरीकरणाच्या रेट्यातही तिने आपले पाय भक्कम रोवले. जागतीकीकरण, शहरीकरण, दूरध्वनी, दूरचित्रवाणी यामुळे तिचा चौफेर प्रवास चालू झाला. आपल्या कुटुंबातील व गावातील, जातीतील, धर्मातील बंधनांची तिला जाणीव होऊ लागली. आत्मकेंद्री वृत्तीत प्रेमाची भावना जागी होऊन ती वर्ण,

जाती, धर्मभेदापलिकडे जाऊन पोहोचली. यातूनच प्राचीन काळातील गांधर्व म्हणजे प्रेमविवाह मोठ्या प्रमाणावर वाढले. या प्रेमविवाहाने दोन संस्कृती, दोन धर्म, दोन जाती इ. चा समन्वय साधला जातोय. पण समाजाची मानसिक भूमिका मात्र विरोधी आहे. प्रेमविवाहाने स्त्रीची हुंडाविषयक समस्या सुटते, वधू परीक्षेची समस्या सुटते, विजोड विवाह टळला जातो. पण समाजाने आंतरजातीय विवाहाला मान्यता न दिल्याने स्त्रीच्या आयुष्यात अनेक समस्या उभ्या राहतात. त्यांचे चित्रण मराठी नाटकातून झाले आहे ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

### *३.१.३.१ 'सोनचाफा' – वसंत कानेटकर*

प्रेमविवाह आणि त्यापासून समाजजीवन जगताना उदभवलेल्या समस्या व त्यावर झालेला संघर्ष यांचे दर्शन या नाटकातून घडते.

योगिता आणि जितेंद्र यांच्या प्रेमविवाहातील समस्या हा पारंपरिक विचारांनी तयार झालेला आहे. जितेंद्रचे वडील सारंगधर संस्थानचे महाराज आहेत. तर योगिता ही अनाथालयात राहणारी मुलगी आहे. तिचे कुळ, गोत्र हे स्पष्ट नसून तिचा जितेंद्रशी विवाह होऊ नये म्हणून महाराज विरोध करतात. पण प्रेमाच्या प्रचंड ताकदीने जितेंद्र आई–वडिलांच्या विरोधाला न जुमानता योगिताशी प्रेमविवाह करतो. येथे गरीब–श्रीमंताची दरी जितेंद्र मानत नाही, जातीभेद नाही, पण महाराज मानतात. ते म्हणतात, "गरीब मुलीला आम्ही श्रीमंत करू शकतो, पण अनाथाश्रमातल्या पोरीला शहाण्णव कुळातली कशी करता येईल?"(१२)

महाराजांना नातू झाला तरीही ते या विवाहाला मान्य करत नाहीत. आपल्या आनंदात आई–वडील सामील होत नाहीत, या दुःखाचे जितेंद्र व योगिता हे समाजातील प्रतिनिधी ठरतात.

जितेंद्र सैन्यदल सोडून 'आझाद हिंद सेने'त भरती होतो. युद्धामुळे त्याच्यावर मृत्यूचे संकट येते. योगिता विधवा होते. दुःखी होते. ती स्वतःच अनाथ असते. अशा दुःखाच्या, संकटाच्या वेळीही जितेंद्रचे आई–वडील योगिताला भेटायला येत

नाहीत. यामुळे योगिताला भेडसावणाऱ्या समस्यांना ती मोठ्या कष्टाने सामोरी जाते.

एके दिवशी संस्थाने खालसा करण्याची बातमी येऊन धडकते. अशात आपल्या संस्थानाला वारस नाही, मग सत्ता जाणार या भितीपोटी महाराज आपल्या सचिवामार्फत नातवाला परत आणतात. मुलासाठी योगिता आपला राग आवरते. ती राजभवनाचा स्वीकार करत नाही. ती लाचारही होत नाही. ती स्वतःचा उदरनिर्वाह स्वतःच करत राहते. दरम्यान नातवाला स्वीकारताना महाराज म्हणतात, "जमिनीला महत्व नाही. बीज महत्वाचे आहे."(१३)

येथे महाराजांनी फक्त बीजाचा विचार केला. पण बीज अंकुरण्यास आवश्यक असणाऱ्या जमिनीला त्यांनी डावलले आहे. नाटकाच्या शेवटी हीच एक अनाथ मुलगी एका बेसहारा झालेल्या महाराजांना सहारा देण्याची गोष्ट करते. धन, संपत्तीची तिच्या मनात कुठलीच लालसा महाराजांना जाणवत नाही. अशा वेळी महाराजांना तिची कुलीनता श्रेष्ठ वाटते. तिचा सून म्हणून स्वीकार करतात. जितेंद्र असताना महाराजांनी स्वीकार केला असता, प्रेमविवाहाला मान्यता दिली असती तर योगिताने लग्नापर्यंत आई—वडिलांच्या पश्चात भोगलेल्य दुःखाचे परिवर्तन आनंदात झाले असते. तिच्या आयुष्यातील समस्यांचा खल शांत असता.

### ३.१.३.२ *'कलमी गुलाब' : प्रतिभा कुलकर्णी*

सदर नाटकात प्रेमानंतर लग्नात रूपांतर होण्याच्या क्रियेत गुजराथी—मराठी जात—धर्म आड येतो, म्हणून नाईलाजाने छळ करणारा का असेना पण स्वजातीधर्मातील अरविंदचा स्वीकार वृंदा करते. अरविंदला वृंदाच्या लग्नापूर्वीच्या प्रेम प्रकरणाची माहिती असते. तरीही संपत्ती मिळविण्याच्या लोभाने अरविंद वृंदाशी लग्न करतो. लग्नानंतर अरविंद वृंदाला पूर्वप्रेमाची आठवण करून चिडवत राहतो. यामुळे वृंदा आपल्या पूर्वप्रेमाला विसरण्याचा प्रयत्न करूनही विसरता येत नाही. अरविंदची नेहमी वृंदाच्या वडिलोपार्जित संपत्तीवर नजर असते. "वा ............ वा

अरविंद मोघे वा! फक्त पंचवीस हजारात आठ लाखाचा माल पदरात पाडून घेतलाय. ददात मिटली. वा! वा! खरे बिझनेसमन आहात. अरे बायकोच्या गळयात प्रेमाने नेकलेस घालून प्रेमानेच तिचा गळा कापला. वा SS वा. खरे प्रेमळ पती आहात. तुम्ही...... वा..... अरविंद मोघे ....... (हसतो)"(१४)

असे अरविंदचे नाटकातील स्वगत समाजजीवनातील वास्तव खलनायकांत असलेले दिसते. जाती–भेदापायी आपले प्रेम गमावून बसलेली वृंदा आपली संपत्तीही हळूहळू गमावत असते.

वृंदा अरविंदला नेकलेस, लग्नाचा वाढदिवस, महाबळेश्वरची सफर या विषयी विचारते. त्यावर अरविंदच्या अगदी उर्मट प्रतिक्रिया येतात. वाढदिवस दरवर्षी येतो, नेकलेस घालायचं तुझं वय राहिलं नाही. त्यासाठी नेकमध्ये नाजूकपणा हवा. दोघांमध्ये नेहमी भांडणं होतात. प्रियकर गिरीशने अजून लग्न केलेले नसते. तो गुजराथी असल्याने व वृंदा मराठी असल्याने त्यांच्या प्रेमविवाहास घरातून मान्यता मिळत नाही. त्यामुळे वृंदाला एक स्त्री म्हणून लवकर विवाह उरकणे अपेक्षित असते. त्यात तिच्याच महाविद्यालयातील मित्र अरविंदशी ती विवाह करते. परंतु अरविंदला फक्त वृंदाची संपत्ती हवी असते. भांडणात अरविंद वृंदाला सांगतो, "(हसत) केवळ पैशासाठी! तू एकुलती एक! आईवडिलांची सर्व इस्टेट तुलाच मिळणार. तशी बरीच मालमत्ता माझ्या नावावर करून घेतली आहे, तुझ्या सह्या घेऊन. चल चालती हो या घरातून. पण जाण्याआधी उरलेली इस्टेट माझ्या नावावर करून जा."(१५) "तू मेली की मोकळा सर्व हडप करायला".(१६) एके दिवशी तर मायलेकींणाही पेटवून देण्यास अरविंद कमी करत नाही. त्यावेळी गिरीश हा वृंदाचा प्रियकर दोघींची मोठ्या संकटातून सुटका करतो. पोलीस कारवाई होऊन अरविंदला शिक्षा होते.

शेवटी गिरीश मायलेकींना स्वीकारून वृंदाशी लग्न करतो आणि नंतरच वृंदाला घरी आणण्यासाठी आपल्या आईची परवानगी मागतो. ती परवानगीही योगायोगाने मिळते. परंतु एका विवाहितेशी लग्न केले म्हणून तिला नातेवाईक काय

म्हणतील याची भिती वाटते. ती म्हणते, "गिरीशने गाईबरोबर वासरूही आणले आहे. आता समाज तोंडाण शेण कोंबेल आपल्या." शाळेत टिनूचे आडनाव बदलले गेल्याने तिच्या मैत्रिणीही तिला फटकून वागू लागतात. येथे एक समस्या संपते तर दुसरी समस्या चालू होते. समाजाचा विरोध पत्करून वृंदा आणि टिनू गिरीशसोबत राहतात पण टिनूच्या भावी आयुष्यात टिनू एका मोठ्या समस्येची शिकार ठरते ती म्हणजे, विवाह. आपला बालपणीचा मित्र प्रेम असूनही टिनूशी लग्न करायला नकार देतो. तो डॉक्टरीचे शिक्षण घेत असला तरी घरच्या अनिष्ट पारंपरिक विचारांनी टिनूला नकार देतो. हा नकार टिनूच्या आईने म्हणजे वृंदाने पहिला पती जिवंत असताना दुसरा पती केला, समाजविरोधी कृत्य केल्याच्या आरोपासाठी असतो. यामुळे टिनूही ठरवते की, 'आपल्या आईने जशा खस्ता खाल्ल्या तशा मीही सोसेन मग ना का कोणी माझ्याशी विवाह करीनात. माझे बाबा गिरीश व आई वृंदा यांच्या आनंदासाठी मी वाट्टेल ते करीन!'

अशा प्रकारे मराठी नाटकात समाजातील वास्तव जीवन नाटककारांनी चित्रित केले आहे. समाजात असणाऱ्या स्त्री–विवाहाच्या समस्या व त्यावरील स्त्रीचा संघर्ष हे समाजाच्या मागासलेल्या मानसिकतेमुळे निर्माण होत आहेत. बदलत्या समाजाने आपली रूढ परंपराही काळाबरोबर बदलायला हवी.

स्त्रीच्या विवाहाच्या असलेल्या वधुपरीक्षा, हुंडा, विजोड विवाह आणि प्रेमविवाह या समस्यांवर उपाय हा प्रेमविवाह आहे. जर प्रेमविवाहच झाला तर वधुपरीक्षा होणार नाही. हुंड्याचा प्रश्न निर्माण होणार नाही, विजोड विवाह टळले जातील. परंतु समाजाने अशा प्रेमविवाहाला मान्यता देणे गरजेचे आहे. हे प्रेमविवाह आंतरजातीय, आंतरधर्मीय स्वरूपाचे असतात. त्यामुळे दोन जातीतील संस्कृती, दोन धर्मातील आचरण यांत एकोपा निर्माण होऊन समाजात सलोख्याचे वातावरण निर्माण होईल. त्यासाठी समाजाने आपली जुनाट मानसिकता बदलून सुधारणावादी विचारांच अवलंब करणे आवश्यक आहे.

## ४. *निष्कर्ष :*

१) मानवी वास्तव जीवनाचे प्रेक्षकांसमोर प्रत्यक्ष केलेले अनुकरण म्हणजे नाटक होय. या अनुकरणात समाजात सुधारणावादी बदल घडविण्याची मोठी ताकत आहे. आदिम काळापासून मानवजात – संघर्षाचे जीवन जगत आली आहे. याचे अविष्करणही मानव मोठ्यातून घडवत आला आहे.

२) बदलत्या समाजजीवनात स्त्रीची होणारी वाताहत खऱ्या अर्थाने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नाटकाच्या विकासाबरोबर चित्रित होत गेली. यामुळे समाजाचे नाटकाने मोठ्या प्रमाणावर लक्ष वेधून घेतले.

३) मराठी नाटकांनी स्त्री–शिक्षण, बालविवाह, कुपोषण, विधवा–पूणविर्वाह, स्त्री–स्वातंत्र्य, संभोग संमतीचे वय, आधुनिक शिक्षणाचे वाईट परिणाम व स्त्रीविषयक दुराचार इत्यादी स्त्रीसमस्या व संघर्ष यांचे चित्रण केले आहे.

४) मराठी नाटकातून स्त्रीविवाहाच्या सामाजिक समस्या व त्यावरचा संघर्ष चित्रित झाला आहे. त्या समस्या म्हणजे स्त्रीच्या आयुष्यात जिवंतपणी मृत्युच आहेत, असे नाटककारांनी चित्रित करूनही, समाजाची अनिष्ट पारंपरिक मानसिकता अजूनही बदललेली नाही.

५) स्त्रीला संघर्ष करायला भाग पाडणाऱ्या प्रमुख समस्या म्हणजे वधूपरीक्षा, हुंडा प्रथा, विजोड विवाह, आंतरजातीय प्रेमविवाह या रूढी आजही समाजात प्रचलित आहेत. याचे नाटककारांनी उत्तम प्रकारे नाटकात चित्रण केलेले आहे. तसेच बदलत्या काळानुसार या रूढी–परंपरा बदलणे अत्यावश्यक आहे, असेही सुचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. परंतु आजही समाजाचे चित्र फारसे बदललेले दिसत नाही.

## ५. *संदर्भ :*


१. फाटक म. वि. – 'नाटकातील संघर्ष'

२. 'गृहशोभिका' (विशेषांक – लव्ह मॅरेज) – फेब्रु. २००४.

३. जोशी महादेवशास्त्री – 'भारतीय संस्कृती कोश', खंड २ रा, पृ. क्र. ७३१.

४. जोगळेकर राम – 'आनंदी – गोपाळ', पृ. क्र. २४.

५. तत्रैव.

६. मतकरी रत्नाकर – 'माझं काय चुकलं?'

७. तत्रैव, पृ. क्र. १५.

८. बेडेकर वि. म. – 'भारतीय स्त्री', पृ. क्र. २४.

९. जोशी महादेवशास्त्री – 'भारतीय संस्कृती कोश', खंड ८ वा, पृ. क्र. ७३१.

१०. जोगळेकर राम – 'आनंदी – गोपाळ', पृ. क्र. १४

११. मतकरी रत्नाकर – 'अग्निदिव्य', पृ. क्र. ११ व १२.

१२. कानेटकर वसंत – 'सोनचाफा', पृ. क्र. १३.

१३. तत्रैव.

१४. कुलकर्णी प्रतिभा – 'कलमी गुलाब', पृ. क्र. १२.

१५. तत्रैव, पृ. क्र. ३३.

१६. तत्रैव.